

# डॉ.मणिभाई देसाई पतसंस्था, उरुळी कांचन

मुख्य कार्यालय : ''मणिश्रीकृष्ण सहकार संकुल'',आश्रम रोड,
उरूळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे.

## ३२ वा
## वार्षिक अहवाल

International Year of Cooperatives
2025
Cooperatives Build a Better World



डॉ. मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित
• उरूळी कांचन •

सहकारातून समृद्धी, समृद्धीतून विकास, विकासातून स्थैर्य साधणारी संस्था.

# संचालक मंडळ


श्री.राजेंद्र ज्ञा.कांचन
संस्थापक अध्यक्ष


श्री.रामदास पं.चौधरी
उपाध्यक्ष


श्री.शरद कि.वनारसे
संचालक


श्री.भाऊसाहेब ल.कांचन
संचालक


श्री.कांतीलाल कों.चौधरी
संचालक


श्री.संजय ज्ञा.कांचन
संचालक


श्री.खेमचंद वि.पुरुसवाणी
संचालक


श्री.संजय तु.टिळेकर
संचालक


ह.भ.प.श्री.जीवन ना.शिंदे
संचालक


श्री.धनसिंग दा.पोंदकुले
संचालक


श्री.अनिकेत रा.कांचन
संचालक


सौ.सारिका ज.काळभोर
संचालिका


सौ.कमल बा.कांचन
संचालिका


श्री.रोहिदास दा.उंद्रे
तज्ञ संचालक


श्री.प्रविण रा.दरेकर
तज्ञ संचालक



प्रेरणास्थान
डॉ.मणिभाई देसाई



संस्था व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये उपस्थित अध्यक्ष,उपाध्यक्ष, संचालक,अधिकारी व कर्मचारी वर्गाला मार्गदर्शन करताना मा.शैलेश कोतमिरे साहेब(निवृत्त सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य)

ABP माझा न्युज चॅनेलच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्राचे **अनमोल रत्न पुरस्कार** मा.उदय सामंत(उद्योग मंत्री,महाराष्ट्र राज्य) व अभिनेत्री स्पृहा जोशी यांच्या हस्ते स्विकारताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.राजेंद्र कांचन,उपाध्यक्ष मा.रामदास चौधरी, संचालक अनिकेत कांचन,धनसिंग पोंदकुले व समवेत ABP माझाच्या कार्यकारी संपादक सरिता कौशिक






२७ एप्रिल रोजी डॉ.मणिभाई देसाई यांच्या जयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबीरामध्ये रक्तदाते ग्रामपंचायत सदस्य मिलिंद जगताप यांचा सत्कार करताना
मा.ज्ञानेश्वर कटके(आमदार,शिरूर हवेली)
मा.रमेश आप्पा थोरात(संचालक,पुणे जि.म.स.बँक)
समवेत अध्यक्ष,उपाध्यक्ष,संचालक व सल्लागार



# हार्दिक अभिनंदन ...!



**मा.श्री.अजितदादा पवार**

उपमुख्यमंत्री, (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री (पुणे जिल्हा)



**मा.श्री.बाबासाहेब पाटील**

सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.श्री.दत्तात्रय (मामा) भरणे**

कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.श्री.ज्ञानेश्वर (आबा) कटके**

आमदार,शिरुर -हवेली




मार्केटयार्ड शाखा रौप्यमोहत्सवी २५ व्या वर्धापन दिनानिमित्त उपस्थित मा.डॉ.राजाराम शिवराम धोंडकर साहेब (सचिव,कृषी उत्पन्न बाजार समिती) यांचा सत्कार करताना रोहिदासशेठ उंद्रे (तज्ञ संचालक) समवेत संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष,संचालक,सल्लागार व अधिकारी वर्ग

शिक्रापूर शाखा प्रथम वर्धापन दिनानिमित्त उपस्थित मा.स्वप्नील बाळासाहेब ढमढेरे यांची पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना राजेंद्र कांचन(संस्थापक अध्यक्ष) समवेत शरद वनारसे,भाउसाहेब कांचन(संचालक)
मा.सोमनाथ भुजबळ मा.संदीप ढमढेरे(सल्लागार)
सौ.पुजाताई भुजबळ(उपसरपंच ग्रामपंचायत-शिक्रापूर)
मा.सोपानराव गवारे(संचालक,रावसाहेब पवार घोडगंगा,सह.सा.का.लि.)





अकलुज शाखा प्रथम वर्धापनदिना निमित्त उपस्थित संस्थापक अध्यक्ष-राजेंद्र कांचन,उपाध्यक्ष-रामदास चौधरी संचालक-शरद वनारसे,कांतीलाल चौधरी,खेमचंद पुरूसवाणी, भाऊसाहेब कांचन,धनसिंग पोंदकुले,बाळासाहेब कांचन (मा.संचालक),व शाखा सल्लागार मा.शितलदेवी मोहिते पाटील, प्रकाशआप्पा एकतपुरे,रावसाहेब मगर,रविराज लव्हाळे व एम.एम.मगर

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. राजेंद्र ज्ञानोबा कांचन | संस्थापक अध्यक्ष |
| श्री. रामदास पंढरीनाथ चौधरी | उपाध्यक्ष |
| श्री. शरद किसन वनारसे | संचालक |
| श्री. भाऊसाहेब लक्ष्मण कांचन | संचालक |
| श्री. कांतीलाल कोंडीराम चौधरी | संचालक |
| श्री. संजय ज्ञानोबा कांचन | संचालक |
| श्री. खेमचंद विष्णुदास पुरूसवाणी | संचालक |
| श्री. संजय तुळशीराम टिळेकर | संचालक |
| ह.भ.प.श्री. जीवन नामदेव शिंदे | संचालक |
| श्री. धनसिंग दादाराम पोंदकुले | संचालक |
| श्री. अनिकेत राजेंद्र कांचन | संचालक |
| सौ. सारिका जयंत काळभोर | संचालिका |
| सौ. कमल बाळासाहेब कांचन | संचालिका |
| श्री. रोहिदास दामोदर उंद्रे | तज्ञ संचालक |
| श्री. प्रविण रामचंद्र दरेकर | तज्ञ संचालक |

## परिशिष्ट अ

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव | : डॉ. मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. |
| २. | मुख्यालय | : "मणिश्रीकृष्ण सहकार संकुल," आश्रम रोड,उरूळी कांचन, ता. हवेली, जि.पुणे. पिन : ४१२ २०२ |
| ३. | नोंदणी क्रमांक | : पी.एन.ए./पी.एन.ए.(४)आर.एस.आर.(सी.आर)१०३२/९३-९४ |
| ४. | नोंदणी दिनांक | : २८ सप्टेंबर १९९३ |
| ५. | कार्यक्षेत्र | :'महाराष्ट्र राज्य' |
| ६. | शाखा विस्तार | : उरूळी कांचन,निगडी प्राधिकरण,केडगांव,गुलटेकडी मार्केटयार्ड, वाघोली, सिंहगड रोड धायरी, हडपसर, शिरूर (घोडनदी) शिक्रापुर,सासवड,अकलुज (जि.सोलापुर) |
| ७. | अधिकृत भाग भांडवल | : १५ कोटी रूपये |
| ८. | वसुल भाग भांडवल | : १२,९६,६८,६९०.०० |
| ९. | सभासद संख्या | : १९,३२५ |
| १०. | राखीव व इतर निधी | : ३३,११,९९,४३७.९७ |
| ११. | ठेवी | : ३१२,१५,४९,२९४.५३ |
| १२. | येणे कर्ज | : २२८,६६,९०,९८१.०० |
| १३. | गुंतवणुक | : १२०,४५,९१,६६४.६४ |
| १४. | एन.पी.ए.तरतूद | : १००% |
| १५. | ऑडीट | : सतत "अ" |
| १६. | बाहेरील कर्ज | : नाही |
| १७. | अहवाल काळातील निव्वळ नफा | : ४,७६,४७,०८८.०० |
| १८. | खेळते भांडवल | : ३७२,१८,८६,०८३.९६ |
| १९. | संमिश्र व्यवसाय | : ५४०,८२,४०,२७५.५३ |
| २०. | अधिकारी वर्ग | : १५ |
| २१. | कर्मचारी | : ८१ |

# ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)

डॉ. मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.उरूळी कांचन या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की,संस्थेची **३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष श्री.राजेंद्र ज्ञानोबा कांचन यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ०२/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.** संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित केली आहे. तरी सभेस पतसंस्थेच्या सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय :**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा.संचालक मंडळाने तयार केलेल्या ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.

३) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२४-२०२५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.

४) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकापेक्षा ज्यादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

५) वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.

६) सन २०२३-२०२४ मध्ये झालेल्या वैधानिक लेखापरिक्षणाचे दोष पुर्तता अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश याची नोंद घेणे.

७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेऊन नोंद घेणे.

८) सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता निबंधकांनी जाहीर केलेल्या नामतालिकेवरील पात्र वैधानिक व अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व लेखापरीक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.

९) सामोपचार/एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत दिलेल्या कर्जखात्यांची माहिती घेऊन नोंद घेणे.

१०) संस्थेकडील अनुत्पादीत कर्ज वसुल होण्याच्या दृष्टीने व्याज सवलत योजना राबविणेबाबत.

११) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी लागू केलेले सुधारीत आदर्श उपविधी **(Model Byelaws)** दुरुस्तीसह स्वीकृती बाबत.

१२) संस्थेसाठी जंगम व स्थावर मालमत्ता खरेदी व विक्रीस पुर्व मान्यता देणे.

१३) सन्माननीय सभासदांच्या आलेल्या सुचनांचा विचार करणे.

१४) मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.

**वार : सोमवार**
**दिनांक : १८/०८/२०२५**

**मा.संचालक मंडळाचे आदेशानुसार**

**लक्ष्मण श्रीपती वाल्हेकर**
मुख्य व्यवस्थापक

**सभासदांना सुचना :**

१) कोरमअभावी सभा तहकुब झाल्यास अर्धा तास थांबुन सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी पूर्ण केले जाईल.

२) सभासदांच्या काही सुचना अगर प्रश्न असतील तर त्यांनी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत दिनांक ३०/०८/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात पाठवावेत. त्यानंतर आलेल्या सूचना व प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

३) आदर्श उपविधीची प्रत संस्थेच्या मुख्यकार्यालय व नजीकच्या शाखेत पाहणेसाठी उपलब्ध होईल.

४) अहवालाची प्रत नजीकच्या शाखेत उपलब्ध होईल.

## अध्यक्षांचे मनोगत

**सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो,**
**स.न.वि.वि.**

आपल्या संस्थेच्या ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संचालक मंडळाच्या वतीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

संस्थेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचा लेखा-जोखा आपणासमोर मांडत असताना ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये संस्थेच्या ठेवी रू.२७९ कोटी ४२ लाखाहून रू.३१२ कोटी १५ लाख झाल्या आहेत रू.३२ कोटी ७२ लाख रूपये वाढ दिसत असून त्याचे प्रमाण ११.७१ % आहे.तसेच कर्ज वाटप रू.२२८ कोटी २९ लाख आहे. संस्थेचा संमिश्र व्यवसाय(कर्ज+ठेवी मिळून)रू.५४० कोटी ८२ लाख झाला आहे.गुंतवणुकही रू.१२० कोटी ४५ लाख आहे. ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेला रू.६ कोटी ४ लाख ढोबळ नफा झाला असून रू.४ कोटी ७६ लाख निव्वळ नफा झाला आहे.

आपणां सर्वांना सांगताना विशेष आनंद होत आहे की,ए.बी.पी.माझा या चॅनेल तर्फे देण्यात येणारा **महाराष्ट्राचे अनमोल रत्न** हा पुरस्कार **मा.उदय सामंत साहेब (उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य)** यांच्या हस्ते संस्थेला मिळाला.त्या मुळे संस्थेच्या नावलौकिका मध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे तसेच संस्थेच्या प्रगतीचा आलेख चढताच राहिला आहे. त्या मध्ये आपल्या सर्वांचे मोलाचे सहकार्य आहे याची आम्हला जाणीव आहे.त्या बद्दल मी आपणांस सर्वांना धन्यवाद देतो व संस्थेची हि यशस्वी वाटचाल या पुढे ही अशीच सुरू राहील या बद्दल खात्री देतो.

दि.१९ जुन २०२४ रोजी संयुक्त राष्ट्राच्या महासभेने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले आहे.ज्या मध्ये शाश्वत विकासात सहकारी संस्थांची महत्वाची भूमिका अधोरेखित केली आहे.आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाची "**Co-operatives Build a Better World**" हि संकल्पना असून सहकारी संस्थांच्या चिरस्थायी जागतिक प्रभावावर प्रकाश टाकते, आजच्या जागतिक आव्हानावर आवश्यक उपाय म्हणून महत्वाची ठरते.सामाजिक,आर्थिक आणि पर्यावरणीय शाश्वत विकासात सहकारी संस्थांची योगदान अधोरेखित करते.

माझी सर्व कर्ज खातेदारांना मन:पूर्वक विनंती आहे की त्यांनी आपले कर्ज खाते एन.पी.ए.मध्ये जाणार नाही याची दक्षता घ्यावी व संस्थेने राबवलेल्या १ % व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यावा व संचालक मंडळास वसुलीसाठी कोणताही कठोर निर्णय घेऊन कायदेशीर कारवाई करण्याची वेळ येऊ देऊ नये तसेच शासनाने चालू सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ही सामोपचर कर्ज परतफेड योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत चालू ठेवली आहे त्याचाही सभासद कर्जदारांनी फायदा घ्यावा.संस्था फक्त ठेवी स्वीकारणे,कर्जवाटप करणे व नफा कमावणे या उद्देशाने काम करत नसून आपण ज्या समाजामध्ये राहतो त्यांच्यासाठीही काही देणे लागतो या सामाजिक बांधिलकीच्या जाणवेतून संस्था दरवर्षी रक्तदान शिबीर,मोफत आरोग्य तपासणी शिबीर,गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ,वृक्षारोपण,गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,वारकऱ्यांना अन्नदान,वैद्यकीय मदत तसेच शालेय विद्यार्थ्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते तसेच विविध विषयांवर व्याख्यान आयोजित केले जाते व त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे.

पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या काही वर्षात पायाभूत सुविधा,रस्ते,वीज,रेल्वे,बंदर या क्षेत्रात विक्रमी भांडवली गुंतवणुकीचे लाभ देशाला मिळत असून,त्यामुळे खाजगी क्षेत्रातील गुंतवणुक ही अर्थव्यवस्थेला स्थिरता देण्यास पोषक ठरत आहे.डिजिटल पायाभूत सुविधा,युवकांची उद्योजकता,सरकारचा पाठिंबा आणि जागतिक गुंतवणुकदार यांचा विश्वास यामुळे आज नवउद्योगांचे राष्ट्र म्हणून भारत उदयास येत आहे.भारतात झालेली डिजिटल क्रांती, यूपीआय सारख्या जगातील सर्वांत प्रगत पेमेंट पध्दतीला बळ देणारी ठरली आहे.

सभासदांना बँकिंगसाठी शाखेत यावे लागणार नाही,यासाठी मोबाईल ॲप,इंटरनेट बँकिंग,आणि एस.ए.एस. सेवा सुरू केली आहे.त्याचा उपयोग करावा,जेणेकरून व्यवहार त्वरित होतील व अकौंट स्टेटमेंट पाहता येईल.लवकरच संस्थेची वेबसाईट सुरू होत आहे.त्याद्वारेही संस्थेचे व्यवहारांची माहिती होईल. तांत्रिक कौशल्य प्राप्त व्हावे यासाठी संचालक,अधिकारी, कर्मचारी वर्गासाठी नियमित प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

या सर्व यशामध्ये माझ्या सर्व सहकारी ,संचालक,सल्लागार,अधिकारी वर्ग,कर्मचारी वर्ग,पिग्मी एजंट,हितचिंतक,सर्व सभासद ,ठेवीदार,खातेदार यांचा मोलाचा सहभाग असून आपण सर्वांनी दाखवलेल्या विश्वासावरच संस्था यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.याची आम्हाला जाणीव असून यापुढेही हा विश्वास असाच कायम राहील ही खात्री आहे.

आपला
**राजेंद्र ज्ञा.कांचन**
**(संस्थापक अध्यक्ष)**

जय हिंद........... जय महाराष्ट्र............जय सहकार..........

# वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो,**
**स.न.वि.वि.**

संस्थेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये संचालक मंडळाने तयार केलेल्या आर्थिक लेखापरिक्षण पुर्ण करून ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक आपणासमोर सादर करीत आहे. या आजपर्यंतच्या झालेल्या आर्थिक घडामोडींचा तपशिल या अहवालातुन आपल्या समोर मांडताना निश्चितच संस्थेची उन्नती दिसून येते.

**सभासद संख्या :**

संस्थेची ३१ मार्च २०२५ अखेर सभासद संख्या १९३२५ इतकी आहे.

**भाग भांडवल :**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल १५ कोटी रूपये आहे.दि.३१/०३/२०२५ अखेर वसुल भागभांडवल रू.१२,९६,६८,६९०.०० शिल्लक आहे.

**ठेवी :**

संस्थेच्या कार्याचा मापदंड म्हणजे संस्थेकडे असलेल्या ठेवी, संस्थेच्या सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२५ अखेर रू.३१२,१५,४९,२९४.५३ ठेवी शिल्लक आहेत.

**कर्ज :**

संस्थेच्या विविध कर्ज योजना असून सभासदांना माफक व्याजदराने कर्ज पुरवठा केला जातो. चांगले कर्जदार जपणे काळाची गरज झाली आहे.कर्जदारांची परतफेड क्षमता,तारण,कारण याबाबींचा विचार करून संचालक मंडळ कर्ज मंजूर करते व त्याची आर्थिक गरज भागविली जाते.३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे एकूण येणे कर्ज बाकी रू.२२८,६६,९०,९८१.०० असून संस्थेचे कर्जाचे ठेवीशी प्रमाण (सी.डी.रेशो) ६५.८६% इतके असुन ते शासकिय नियमाप्रमाणे राखले आहे.तसेच संस्थेचे एकूण कर्जाच्या ९९.९०% कर्ज ही तारणी कर्ज आहेत. ही संस्थेच्या स्थैर्याच्या दृष्टीने जमेची बाजू आहे.

**कर्ज वसुली :**

संस्था कर्जाचे वितरण करण्यापुर्वी ते कर्ज अनुत्पादित होऊ नये यासाठी त्याची सर्वांगीण छाननी करते. त्यातूनही जी कर्ज अनुत्पादित होतात त्यांच्या वसुलीसाठी संचालक मंडळ सुनियोजित पद्धतीने सर्वतोपरी प्रयत्न करीत असते.वसुलीसाठी आखलेले धोरण सर्व विशेष वसुली अधिकारी, वसुली अधिकारी, शाखाव्यवस्थापक, कर्मचारी, पिग्मी एजंट यांनी केलेल्या प्रयत्नामुळे थकबाकीचे प्रमाण कमीतकमी राखण्यात यश आले आहे.नोटबंदीनंतर आर्थिक व्यवहारांवर आलेले निर्बंध तसेच कोरोना महामारीमुळे सर्वांची चुकलेली आर्थिक गणितं, सर्वच बँकिंग क्षेत्रामध्ये आलेले मंदीचे सावट व सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी यामुळे संस्थेच्या कर्जवसुलीवर परिणाम झाला असून यापुढेही कर्ज वसूलीकडे विषेश लक्ष देण्याचे संचालक मंडळाने ठरविले आहे एन पी ए मधील कर्जखात्यांच्या वसुलीसाठी व्याज सवलत योजना राबविली आहे.सहकार खात्याने राबविलेली सामोपचार कर्ज परतफेड योजनाही राबवली जात आहे व त्या व्यतिरिक्त कर्ज वसुलीचे कामकाज जलदगतीने होण्याकरीता कलम १०१ अन्वये दावे दाखल करणेकामी पुणे जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे सहकार्य मिळत आहे.

**एन.पी.ए.तरतुद :**

मा. सहकार आयुक्त कार्यालयाने पतसंस्थांसाठी एन.पी.ए.चे निकष लागू केले आहेत. संस्थेने एन.पी.ए. नियंत्रीत ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. संस्थेची मार्च २०२५ रोजी एन.पी.ए.तरतुद रु. ८,५८,०८,९३२.४४ इतकी असून १००% एन.पी.ए.तरतुद केलेली आहे.

**गुंतवणुक :**

कर्जाव्यतिरिक्त संस्थेकडे असलेल्या अतिरिक्त निधीचे व्यवस्थापन करणे ही पतसंस्थांमध्ये तारेवरची कसरत असते.व्याजदरांच्या चढ-उताराची अनिश्चितता असतानाही सुरक्षितता व विश्वासार्हता या पार्श्वभुमीवर तरलतेपोटी मोठ्या शेड्युल सहकारी व सरकारी बँकामधुन ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेने रु.१२०,२६,५१,६०५.०० रूपयांची गुंतवणुक केलेली आहे.

**स्वनिधी :**

आर्थिक सुदृढतेचे परिणाम असलेला घटक म्हणजे संस्थेचा स्वनिधी, संस्थेच्या स्थैर्यामध्ये उत्तरोत्तर वाढणारा स्वनिधीचा मोठा सहभाग असतो.३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचा स्वनिधी रू.४१,८८,९०,१००.९२ इतका आहे.

**हार्दिक अभिनंदन...!**

- संस्थेचे सभासद मा.विजय श्रीरंग तावरे यांची दि.माळेगांव सहकारी साखर कारखाना लि.शिवनगर,ता.बारामतीच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद श्री.भरत दत्तात्रय काळभोर ग्रामपंचायत-लोणी काळभोर सरपंचपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद सौ.शकुंतला सुरेश टिळेकर ग्रामपंचायत भवरापूर उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद श्री.बाळासाहेब आबु थोरात ग्रामपंचायत-खामगावटेक उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद श्री.सदाशिव बाबुराव टिळेकर यांना भारतीय शुगर यांच्याकडून सर्वोकृष्ट शेतकी अधिकारी(खाजगी कारखाना) या विभागातून पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद सौ.संगिता सदाशिव टिळेकर यांची श्रीनाथ म्हस्कोबा क्रेडिट को-ऑप सोसा.लि.च्या व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद श्री.सागर योगिराज कांचन यांची चन्नेश्वर वि.का.सोसायटीच्या चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
- सभासद श्री.मारूती किसन थोरात यांची चन्नेश्वर वि.का.सोसायटीच्या व्हाईस चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन..!
  तसेच ज्या सभासदांची विविध क्षेत्रा मध्ये निवड झाली असेल त्यांचेही संस्थेचेवतीने हार्दिक अभिनंदन...!

**सामाजिक व शैक्षणिक उपक्रम :**

संस्था दरवर्षी विविध उपक्रम राबविते त्यास समाजातुन चांगला प्रतिसाद मिळतो.त्यापैकी काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

**आषाढी वारीतील वारकऱ्यांसाठी अन्नदान :**

दरवर्षी संस्थेच्या वतीने जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील श्री संत बहिणाबाई महिला प्रासादिक दिंडीतील वारकऱ्यांसाठी उरूळी कांचन येथे दुपारच्या विश्रांती समयी अन्नदान केले जाते.

**रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर :**

दरवर्षी २७ एप्रिल रोजी डॉ.मणिभाई देसाई यांच्या जयंती निमित्त विश्वराज हॉस्पिटल लोणी काळभोर , तर्पण ब्लड बँक व संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर तसेच विश्वराज हॉस्पिटल-लोणी काळभोर यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर महिलांसाठी,लहान मुलांसाठी ,ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केले जाते.

**गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ :**

संस्थेच्या वतीने दरवर्षी माध्यमिक, उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला जातो. तसेच परिसरामधील गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य व खाऊ वाटप केले जाते व विद्यार्थ्यांना या निमित्ताने प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जातो. व त्यांच्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित केल्या जातात.

**वृक्षारोपण :**

परिसरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण केले जाते तसेच वृक्षारोपणासाठी लक्ष्मीतरू या पर्यावरण पुरक झाडाच्या ५०० रोपाचे वाटप करण्यात आले.

**आर्थिक मदत :**

* संस्थेच्या वतीने खेळामध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडुंना खेळाचा गणवेश किंवा साहित्य खरेदीसाठी आर्थिक मदत देऊन सहकार्य केले जाते.
* संस्थेच्या परिसरातील धार्मिक कार्याना,मंदिर जिर्णोध्दार इ. कार्यक्रमांना आर्थिक मदत केली जाते.
* संस्थेच्या सभासदांना गंभीर आजारांच्या वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक मदत केली जाते.

**प्रशिक्षण :**

संस्थेच्या व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी संचालक,अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येते.दि.८ मार्च २०२५ ते १० मार्च २०२५ या दरम्यान प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये मा.शैलेश कोतमिरे (निवृत्त सहकार आयुक्त व निबंधकसो ) यांनी "**समग्र पतसंस्था व्यवस्थापन** या विषयावरती मार्गदर्शन केले.तसेच मा.डॉ.प्रशांत खोपटीकर (बँकिंग तज्ञ) यांनी "**NPA व्यवस्थापन**" या विषयावर मार्गदर्शन केले.

**हिशोब तपासणी :**

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण, व्ही.बी.जैन ॲण्ड असोसिएट्स, पुणे यांनी केले आहे. तसेच शासकिय लेखापरिक्षण करणेकरीता मंगेश शेंडे ॲन्ड कंपनी (चार्टर्ड अकौंटेट,पुणे)यांची नियुक्ती करण्यात आली होती.त्यांनी सर्व शाखांचे लेखापरिक्षण पुर्ण केले असून संस्थेच्या कामकाजाबाबत व प्रगतीबाबत समाधान व्यक्त करून संस्थेस ऑडिट वर्ग "**अ**" प्रदान केला आहे.

**विविध सुविधा :**

संस्थेच्या माध्यमातून खातेदारांना एकाच ठिकाणी जास्तीत जास्त सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो.त्यामध्ये विविध कर्ज सुविधा, ॲट पार चेक सुविधा, लॉकर्स सुविधा,अधिकृत वीज बील भरणा केंद्र,सोने तारण कर्ज सुविधा, RTGS / NEFT, ई पेमेंट व एस एम एस सुविधा पुरविल्या जातात.त्याचबरोबर संस्थेच्या सर्व शाखांमधून इतर शाखंचे कर्ज हप्ते स्विकारणे अथवा इतर व्यवहार करण्याचीही सुविधा आहे. व सी.बी.एस. संगणक प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

**बँकर्स :**

१) पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.पुणे
२) आय.डी.बी.आय.बँक,पुणे
३) दि विश्वेश्वर सहकारी बँक मर्या.पुणे
४) साधना सहकारी बँक मर्या.पुणे
५) बँक ऑफ बडोदा,पुणे
६) भारती सहकारी बँक मर्या.पुणे
७) दि सारस्वत को.ऑप.बँक,पुणे
८) जी एस महानगर को.ऑप.बँक,पुणे
९) पुणे पीपल्स को.ऑप.बँक,पुणे
१०) सुवर्णयुग सहकारी बँक मर्या.पुणे
११) दि बारामती सहकारी बँक मर्या.पुणे
१२) संत सोपानकाका सहकारी बँक मर्या.पुणे
१३) आय सी आय सी आय बँक लि.
१४) येस बँक लि.

## सभासदांसाठी सुचना

१) संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा भरणा केल्यानंतर त्याचे सही व शिक्का मारलेले जमा चलन घेणे आवश्यक आहे.
२) सभासदांनी दरवर्षी आपला लाभांश घेऊन जावा अन्यथा सदर लाभांश गंगाजळीमध्ये जमा करण्यात येतो.
३) कर्जदारांनी आपला कर्ज हप्ता वेळेवर भरणा करून कर्ज खाते एन.पी.ए मध्ये जाणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच नियमित हप्ते भरणाऱ्या कर्जदारास व्याजदरामध्ये १% सुट देण्यात येते.
४) ठेव पावतीची मुदत संपल्यानंतर सदर पावतीचे नुतनीकरण मुदत संपल्यापासून १४ दिवसांच्या आत करून घ्यावे. अन्यथा त्यापुढील मुदतीस बचत ठेवी प्रमाणे व्याज दर आकारण्यात येईल.
५) ज्या सभासदांचे पत्ते व मोबाईल नंबर बदलले असतील त्यांनी संस्थेच्या कार्यालयात नवीन पत्ते व मोबाईल नंबर लेखी स्वरूपात कळवावेत.
६) माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परिक्षेमध्ये ज्या सभासदांच्या पाल्यांना ७०% पेक्षा जास्त गुण मिळतील त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यासाठी सभासदांनी निकाल लागल्यानंतर नजिकच्या शाखेमध्ये गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जमा करावी.
७) सर्व सभासदांनी नजिकच्या शाखेमधून आपले शेअर्स सर्टिफिकेट घेऊन जावेत.
८) ज्या सभासदांचे के.वाय.सी.पुर्ततेसाठी पॅन कार्ड, आधारकार्डची झेरॉक्स प्रत व मोबाईल नंबर नसतील त्यांनी जवळच्या शाखेत जमा करावेत.

## अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल

मी डॉ.मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित. उरूळी कांचन, ता.हवेली.जि. पुणे - ४१२२०२ या संस्थेचा सोबत जोडलेल्या दिनांक-३१ मार्च २०२५ या दिनांकाच्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केले असून अहवाल करतो की -

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूरी ती सर्व माहिती व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.
२) माझ्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल त्यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० या कायदा व त्याखालील नियम व संस्थेचे पोट नियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.
३) मी तपासलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रके संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत.
४) माझ्या मते व संपूर्ण माहिती प्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलाशावरून हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० या कायदा त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशारितीने आवश्यक अशी ती सर्व माहिती देतात आणि
५) ताळेबंदाच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०२५ ची संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची
६) नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत,या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अगर मुदतीत संस्थेच्या नफ्याची लेखा परीक्षण अहवालामधील शेऱ्याच्या अवलोकनास पात्र सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहेत.

स्थळ : पुणे
दिनांक :२१/०७/२०२५
युडीआयएन नं. :**25046840BMORTG6235**

**व्ही.बी.जैन ॲण्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट,पुणे
अंतर्गत लेखापरिक्षक

# सनदी लेखापरिक्षण अहवाल

नमुना एन - २

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) पाहा)

**सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांच्या अहवालाचे निदर्शनात्मक स्वरूप**

प्रति,

चेअरमन

**डॉ.मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.**

उरूळीकांचन, ता.हवेली, जि.पुणे - ४१२२०२

## आर्थिक पत्रकांवर अहवाल

१) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दि.०५.०९.२०२४ ठराव क्र.९ नुसार आम्ही दि.३१ मार्च २०२५ रोजीच्या डॉ.मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, उरूळी कांचन(पतसंस्था)च्या सोबतच्या आर्थिकपत्रकांचे लेखापरीक्षण केले आहे.ज्यात ३१ मार्च २०२५ च्या आर्थिक वर्षाअखेरीचा ताळेबंद,आणि त्यादिवशी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा खाते रोख प्रवाह पत्रक(कॅशफ्लो)आणि महत्वपूर्ण लेखाधोरणांचा सारांश ,टिपा आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे.आमच्याकडून लेखापरीक्षण केलेल्या ११ शाखांचे विवरण या आर्थिक पत्रकांमध्ये समाविष्ट केले आहे.

## आर्थिक पत्रकांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी

२) सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार,महाराष्ट्र,सहकारी संस्था अधिनियम ,१९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था यांनी दिलेली मार्गदर्शक तत्वे नियम ,१९६१,(लागु असणारे) आणि भारतामध्ये सामान्यत: स्वीकारले गेलेले लेखातत्वे (पतसंस्थेला लागू असणारे)यानुसार पतसंस्थेची आर्थिक स्थिती आणि आर्थिक कामागिरी,खरा व रास्त दृष्टिकोन दाखवणारी आर्थिकपत्रके तयार करण्यास व्यवस्थापन जबाबदार आहे.या जबाबदाऱ्यामध्ये मुक्त असलेल्या (मग ते फसवणुक किंवा त्रुटीमुळे असो)आर्थिकपत्रकांच्या तयारीशी संबंधित आहे.

## लेखापरीक्षकांची जबाबदारी

३) आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे या आर्थिकपत्रकांवर मत व्यक्त करण्याची आमची जबाबदारी आहे.आम्ही इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केलेल्या लेखापरीक्षण मापदंडानुसार आमचे लेखापरीक्षण केले. त्या मानकांची आवश्यकता आहे की आम्ही नैतिक आवश्यकतांचे पालन करतो आणि आर्थिकपत्रके भौतिक चुकीच्या विधानांपासून मुक्त आहे की नाही याबद्दल वाजवी आश्वासन प्राप्त करण्यासाठी लेखापरीक्षणाची योजना आखतो आणि त्याप्रमाणे लेखापरीक्षण करतो.

४) लेखापरीक्षणामध्ये आर्थिकपत्रकां मधील रक्कम आणि प्रकटीकरणाविषयी लेखापरीक्षण पुरावे मिळवण्यासाठी प्रक्रिया करणे सामाविष्ट असते.निवडलेल्या कार्यपध्दती लेखापरीक्षकांच्या निर्णयावर अवलंबून असतात,ज्यात फसवणुक किंवा त्रुटीमुळे आर्थिक पत्रकाच्या भौतिक चुकीच्या विधानांच्या जोखमींचे मूल्यमापन समाविष्ट आहे.त्या जोखमीचे मूल्यमापन करताना,लेखापरीक्षक पतसंस्थेने केलेल्या आर्थिकपत्रकाच्या रास्त सादरीकरणाशी संबंधित अंतर्गत नियंत्रण विचारात घेतात जेणेकरून परिस्थितीनुसार योग्य असलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेची रचना केली जाते,परंतु पतसंस्थेच्या अंतर्गत नियंत्रणाच्या प्रभावीतेवर मत व्यक्त करण्याच्या हेतूने लेखापरीक्षण प्रक्रियेची रचना केली जात नाही. लेखापरीक्षणामध्ये वापरलेल्या लेखाधोरणांची योग्यता आणि व्यवस्थापनाने केलेल्या लेखाअंदाजांच्या वाजवीपणाचे मूल्यमापन करणे,तसेच आर्थिकपत्रकाच्या एकूण सादरीकरणाचे मूल्यमापन करणे यांचा समावेश होतो.

५) आमचा विश्वास आहे की आम्हांला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आमच्या लेखापरीक्षणाच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

## मत

६) खालील लेखामानकांचे पालन केले गेले नाही.लॉकरभाडे रोख पध्दतीने हिशेब करण्याबाबत लेखामानक-९कर्मचारी सेवानिवृत्तीलाभ आवश्यक प्रकटीकरण न करण्याबाबत लेखामानक -१५ वरील शेऱ्यास पात्र राहुन,

तसेच आमच्या स्वतंत्र अहवालास पात्र राहुन,आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार,आणि टिपासह महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ ने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना (लागू असणाऱ्या)आणि महाराष्ट्र सहकारी संस्था आयुक्त यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे आवश्यक त्या पद्धतीने आणि भारतात सामान्यत:स्वीकारल्या गेलेल्या लेखातत्त्वांच्या अनुषंगाने

अ) ताळेबंदासंबंधी ३१ मार्च २०२५ रोजी पतसंस्थेच्या आर्थिक परिस्थितीची स्थिती:

ब) नफा आणि तोटा खात्याच्या बाबतीत,त्या तारखेला संपलेल्या वर्षाचा नफा:यांची खरी व रास्त परिस्थिती दाखवतात.

**इतर कायदेशीर बाबींवर अहवाल**

७) पतसंस्थेचा ताळेबंद व नफातोटापत्रक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महारष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ प्रमाणे तयार केलेले आहेत.

८) आम्ही नमूद करतो की : येथे परिच्धेद ६ मधील आमच्या टिप्पण्यांच्या अधीन राहून,

अ)आम्ही सर्व माहिती आणि स्पष्टीकरण प्राप्त केले आहे,जे आमच्या सर्वोत्तम ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे आमच्या लेखापरीक्षणासाठी आवश्यक होते आणि ते समाधानकारक असल्याचे आढळले आहे.

ब)आमच्या मते,कायद्याने आवश्यकते नुसार खात्याची योग्य पुस्तके पतसंस्थेने ठेवली आहेत असे त्या पुस्तकांच्या आमच्या परीक्षेतून दिसते आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या हेतूसाठी आवश्यक पत्रके शाखा/कार्यालयांकडून प्राप्त झाली आहेत.

क) पतसंस्थेचे जे व्यवहार आमच्या दृष्टोत्पत्तीस आले आहेत ते पतसंस्थेच्या अधिकारात आहेत.

ड) या अहवालामध्ये नमूद केलेले ताळेबंद आणि नफा-तोटा खाते ,हिशेब पुस्तकांशी आणि पत्रकांशी सहमत आहेत.

इ) पतसंस्थेने स्वीकारलेली लेखामानके पतसंस्थांसाठी लागू असलेल्या भारतात सामान्यत: स्वीकारल्या गेलेल्या लेखा तत्त्वानुसार निर्धारित केलेल्या मानकांशी सुसंगत आहेत.

९) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९(६) नुसार आवश्यक तपशील स्वतंत्रपणे लेखापरीक्षण निवेदनामध्ये दिले आहेत.

१०) आम्ही पुढे नोंदवतो की लेखापरिक्षणाखालील वर्षासाठी,पतसंस्थेला "**अ**"वर्गीकरण देण्यात आले आहे.

**दि.३१/०७/२०२५ स्थळ : पुणे**

**पॅनल क्रमांक :११७४४**

**युडीआयएन नं. :25118250BMLXCP9065**

**मंगेश शेंडे अँड कंपनी**
**में. नं.११८२५०**
**सनदी लेखापरिक्षक**

## नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या कर्जदारांना १% व्याजात सुट

संस्थेच्या शाखांमध्ये खालील कर्जदारांनी आपले कर्ज हप्ते दरमहा वेळेत भरून संस्थेकडून १% व्याजदरात सुट मिळविण्याचा मान मिळविला आहे व इतर कर्जदारांना एक आदर्श घालून देण्याचे काम या कर्जदारांनी केले असून याची नोंद घेवून संचालक मंडळाने त्यांना सन्मानित करण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | शाखा | अ.क्र. | कर्जदाराचे नाव | शाखा |
|---|---|---|---|---|---|
| १ . | श्री.तात्याबा राजाराम शेंडगे | उरूळी कांचन | ११. | श्री.समीर शंकर उंद्रे | वाघोली |
| २ . | श्री.महेश प्रेमजी पटेल | उरूळी कांचन | १२. | श्री.मिनीनाथ लक्ष्मण पिसाळ | वाघोली |
